"कायम विना अनुदानित"
" ~~विना अनुदानित~~"

पुणे जिल्हा परिषद
" यशवंतराव चव्हाण भवन "
शिक्षण विभाग (प्राथमिक)
जा.क्र. जिप / शिक्षण/प्राथ/दोन / ७ / ३६६ १०५ /
पुणे - १ दिनांक - २५ / १२ /२००५.

प्रति,
गट शिक्षणाधिकारी,
पंचायत समिती -- खेड

विषय : - सन २००४ - २००५ या शैक्षणिक वर्षात नवीन खाजगी प्राथमिक शाळांना परवानगी देणेबाबत. माध्यम - इंग्रजी

संदर्भ :- १) शासनाकडील शिक्षण सेवायोजन विभाग पत्र क्रं. व्हीएलएम/ १००४ ( २८०/ ०४ )/( )/प्राशि-३, दि. १२ / ८ /२००४
२)शिक्षण उपसंचालक, पुणे विभाग, पुणे यांचे पत्र जा.क्र.प्रा/ाशि -३ / खाप्राशा/मान्यता/ पुवि/ २०/११६९८ /२००५दि. २० /१२ /२००५

उपरोक्त विषयानुसार महाराष्ट्र शासन शिक्षण व सेवा योजन विभाग यांनी स्थानिक गरज लक्षात घेवून सोबतचे यादीत खाली नमूद केलेल्या संस्थेच्या नावासमोर दर्शविलेल्या ठिकाणी जून २००४ पासून इयत्ता १ ली ते च्या वर्गास सन २००४ -०५ या शैक्षणिक वर्षात ~~प्रत्यक्ष सुरू असलेल्या वर्गासह, त्यकी एका तुकडीस~~ प्राथमिक शाळा सुरू करणेस खाली नमूद केलेल्या अटींची पूर्तता करण्याच्या शर्तीवर ~~विना अनुदान तत्वावर~~ / ~~कायम विना अनुदान तत्वावर " खास बाब " म्हणून परवानगी देण्यात येत आहे. तसेच~~ इंग्रजी माध्यमाच्या खाजगी प्राथमिक शाळांना कायम विना अनुदान तत्वावर तसेच भविष्यात माध्यम बदलता येणार नाही या अटींवर परवानगी देण्यात येत आहे.

| अ.क्रं | संस्थेचे नांव | शाळेचे नांव, ठिकाण | इयत्ता | माध्यम |
|---|---|---|---|---|
| १) | हरदेवसिंह बाबा एज्युकेशन सोसायटी, भोसरी (कायम विनाअनुदान) | वाकी खुर्द चाकण | १ ली च्या वर्गास फक्त | इंग्रजी |

३.१ सदर संस्था नोंदणी अधिनियम १८६० व मुंबई सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियम १९५० प्रमाणे नोंदणीकृत किंवा केवळ मुंबई सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियम १९५० प्रमाणे नोंदणीकृत असली पाहिजे.

३.२ शाळेची इमारत व परिसर शिक्षणाकूल, स्वच्छ व सुरक्षित असला पाहिजे.

३.३ शाळेस शासनाने वेळोवेळी विहीत केल्यानुसार शैक्षणिक व व्यावसायिक अर्हतेचा आवश्यक सक्षम कर्मचारी वृंद व शासनाने वेळोवेळी विहीत केलेल्या वेतनश्रेण्या व सेवाशर्तीच्या अधिन राहून नेमला पाहिजे.

३.४ संस्थेची आर्थिक परिस्थिती, संस्थेकडील भौतिक सुविधा, व्यवस्थापन विषयक सुविधा शाळा व्यवस्थित चालविण्यासाठी सुयोग्य असणे आवश्यक आहे.

३.५ संस्थेने या शाळेसाठी शासनाने वेळोवेळी विहीत केलेल्या अभ्यासक्रमांची अंमलबजावणी केली पाहिजे. तसेच अभ्यासक्रम, पाठयपुस्तके, मुल्यमापन पध्दती, शालेय व सहशालेय कार्यक्रम व उपक्रम यांचे सुयोग्य कार्यान्वित केले पाहिजे व त्यासाठी आवश्यक सर्व सुविधा पुरविल्या पाहिजे.

पंचायत समिती खेड (शिक्षण विभाग)
शाखा- 1 AUG 2006
क्रमांक -
गट शिक्षणाधिकारी

.....२

२

३.६ संस्थेने शाळेतील विद्यार्थ्यांसाठी / कर्मचाऱ्यांसाठी विहीत नोंदवह्या अदयावत आणि विश्वासार्ह स्वरूपात कार्यान्वित ठेवल्या पाहिजेत.

३.७ संस्थेने शाळेतील वातावरण शिक्षणाकूल ठेवणे आवश्यक आहे. तसेच शाळेतील विद्यार्थ्यांमध्ये विधायक शिस्त निर्माण करणे, तसेच वक्तशीरपणा, नीटनेटकेपणा आणि नियमित उपस्थिती या गोष्टी त्यांच्यावर बिंबविणे आवश्यक आहे.

३.८ संस्थेने परवानगीसाठी विहीत केलेले नाव, शाळेची जागा इत्यादी मध्ये भविष्यात कोणताही बदल करता येणार नाही.

३.९ संस्थेने शासनाच्या वेळोवेळी निर्गमित होणाऱ्या आदेशाचे, कार्यपध्दतीचे, नियमाचे पालन करणे आवश्यक आहे.

३.१० संस्थेने विद्यार्थ्यांना शाळेत प्रवेश देताना परिसरातील इतर मान्यता प्राप्त प्राथमिक शाळांवर विपरीत परिणाम होणार नाही याची खबरदारी घेणे आवश्यक आहे.

**३.११ शासनाने ज्या ठिकाणासाठी परवानगी दिलेली आहे त्या ठिकाणी व्यतिरिक्त इतर ठिकाणी प्राथमिक** शाळा सुरू केल्यास शासनाने दिलेली परवानगी आपोआप रद्द समजण्यात येईल.

३.१२ शासनाने परवानगी दिलेल्या वर्षी संबंधित शाळा सुरू न केल्यास पुढील वर्षी नुतनीकरणासाठी अर्ज समक्ष क्षेत्रीय अधिकाऱ्यांकडे ( परवानगी दिलेल्या शैक्षणिक वर्षात करणे) करणे बंधनकारक राहिल. अन्यथा शासनाने दिलेली परवानगी रद्द समजण्यात येईल. एक वर्षानंतर नुतनीकरणासाठी केलेल्या अर्जाचा विचार करता येणार नाही.

---

---

ही परवानगी देण्यापूर्वी संस्थेबाबत खाली नमूद केलेल्या बाबींची पुन्हा खात्री करून घेऊन मगच संस्थेला खाजगी शाळेची मान्यता देणेबाबत कार्यवाही करण्यात यावी.

१) संबंधित संस्था, संस्था नोंदणी अधिनियम १८६० व महाराष्ट्र विश्वस्त अधिनियम १९५० प्रमाणे नोंदणीकृत असावी किंवा केवळ महाराष्ट्र सार्वजनिक विश्वस्त अधिनियम १९५० प्रमाणे नोंदणीकृत असावी.
२) संस्थेविरूध्द गंभीर स्वरूपाच्या तक्रारी नाहीत.
३) सदर संस्थेने चालविलेल्या प्राथमिक शाळांपैकी एखाद्या शाळेची मान्यता काढून घेतलेली नाही.
४) संबंधित संस्थेत कोणत्याही प्रकारचा गैरव्यवहार चालत असल्याबाबत तक्रारी आलेल्या नाहीत अथवा संस्थेने चालविलेल्या शाळा शासनाने ताब्यात घेण्याबाबत एखादे प्रकरणे प्रलंबित नाही.
५) संस्थेची आर्थिक परिस्थिती पुरेशी समाधानकारक आहे.
६) संस्थेने विहीत नमुन्यात शुल्क अर्ज केला आहे. (यापुर्वी अर्ज केला नसल्यास तो करून घ्यावा.)
७) शासनाची मंजूरी नसतांना प्राथमिक शाळा चालू ठेवण्याबाबत प्रत्येक शैक्षणिक वर्षासाठी रूपये १००/- दंड संस्थेने कोषागारात भरला आहे.

तरी याबाबत पुढील आवश्यक ती कार्यवाही तात्काळ करण्यात यावी व केलेल्या कार्यवाहीचा अहवाल त्वरीत या कार्यालयास पाठवावा.

शिक्षणाधिकारी ( प्राथ.)
जिल्हा परिषद, पुणे. करिता

प्रत - १) मुख्याध्यापक, शाळा ------------------------------------
प्रत - २) सचिव ------------------------------------
प्रत - ३) विस्तार अधिकारी ( शिक्षण) यांना माहिती व योग्य त्या कार्यवाहीस सोबतच्या सर्व शाळांची वार्षिक तपासणी ( ) होवून अहवालाची एक प्रत इकडे न चुकता पाठविणेची दक्षता घ्यावी.